

वाचन पातळी ३

ट्यूबच्या आत टूथपेस्ट शरिते तरी कशी?

Author: Veena Prasad

Illustrator: Rajiv Eipe

Translator: Sushrut Kulkarni

ही गोष्ट आहे १८७० सालची. अमेरिकेत असणाऱ्या कनेक्टकिट इथल्या न्यू लंडन या गावातली. सकाळचे ७ वाजले आहेत. मुलं आपल्या उबदार अंथरुणातून नाईलाजानं कशीबशी बाहेर पडताहेत, त्यांच्या आया त्यांना तोंड धुवायला पटिाळतायत आणि सोबत त्यांच्या हातात दात घासायची काडी आणि टूथपेस्टच्या बरण्या ठेवतायत.

ऐकलंत, काय म्हणाले मी? “दात घासायची काडी”?

होय. अगदी खरं आहे ते. १८७० सालापर्यंत अमेरिकेतही दात घासायला काडीचाच वापर केला जायचा. ही काडी म्हणजे झाडाची छोटीशी फांदीच असायची. दात घासण्यासाठी तिची एक बाजू ब्रशसारखी केलेली असायची.

काही मोजक्या नशीबवान मुलांना आपले दात चमकदार करायला एका टोकाला चक्क रानडुकराचे केस लावललेली काडी मिळायची.

आणि मी आणखी दुसऱ्या कोणत्या गोष्टीबाबत बोलले सांगा पाहू?

“टूथपेस्टच्या ब र ण्या ”?

होय बरोब्बर.

तोवर टूथपेस्टसाठी असणाऱ्या ट्यूबचा शोध लागलेलाच नव्हता. त्यावेळी टूथपेस्ट फक्त बरण्यांतूनच मिळत असे. प्रत्येक मूल सकाळी उठल्यावर झोपाळू डोळ्यांनी त्या टूथपेस्टनं भरलेल्या चिनीमातीच्या बरणीत आपली दात स्वच्छ करण्यासाठीची काडी बुडवत असे.

खरंतर मुलंच काय, चिनीमातीच्या त्या बरणीमधे घरातला प्रत्येकच जण आपापली दातांसाठीची काडी बुडवायचा. क्वचित येणारी, दूरवरच्या नात्यातली आणि काळेपिवळे दात असणारी म्हातारी आजी असते ना? अगदी तीसुद्धा तिच्या दातांच्या रंगांसारखीच कळकट-मळकट काडी त्याच बरणीत बुचकळत असे.

एका भल्या सकाळी एका दंतवैद्याच्या घरात मोठ्ठी किंचाळी ऐकू आली.
“ईऽऽईऽऽयाकऽऽऽ“
असं जोरात ओरडणारी स्वारी होती लुसियिसची! त्याचे बाबा, म्हणजे डॉ. शेफलिड हे दंतवैद्य होते. सगळ्यांनी असं एकाच बरणीत काड्या बुडवणं लुसअिसला अगदी म्हणजे अगदीच किळसवाणं वाटायचं. यापुढं आपण फक्त टूथ पावडरच वापरणार, असं त्यानं त्यादविशी जाहीरच केलं.
पण त्याच्या डोक्यात वचिार मात्र घोळत राहलिा – टूथपेस्ट सहज वापरता येईल असा यापेक्षा दुसरा एखादा चांगला मार्ग नक्कीच असला पाहजिे.

काही वर्षांनी लुसअिस मोठा झाला आणि दंतवैद्यकीचा अभ्यास करायला पॅरसिला गेला. तथिं त्यानं चति्रकारांना रंगांच्या ब्रशवर धातूच्या ट्यूबमधून रंग काढताना पाहलिं. ते बघून त्याच्या डोक्यात लखखकन वीज चमकली – ' अरेच्च्या! टूथपेस्टसुद्धा अशीच ट्यूबमधे भरून सोपेपणानं नाही का वापरता येणार?' ही कल्पना सांगायला ताबडतोब त्यानं घरी, आपल्या बाबांकडं धाव घेतली. सुदैवानं त्याच्या बाबांनासुद्धा ही कल्पना अफलातून वाटली.

आता फक्त एकच छोटासा प्रश्न उरला होता – तो म्हणजे, बरणीत असणारी पेस्ट ट्यूबच्या छोट्याशा तोंडातून आत भरायची कशी, हे शोधणं. तुम्हाला काय वाटतं, लुसिअसनं ती रिकाम्या ट्यूबमधे कशी बरं भरली असती?

तुमच्या आयुष्यात एखादी वाईट्ट सकाळ उगवलेली आहे का? म्हणजे सकाळी उठल्यावर, झोपेच्या गुंगीत असताना टूथपेस्टची ट्यूब तुमच्या हातून खूपच जास्त दाबली जाते आणि ती भस्सकन बाहेर सांडते. वॉशबेसनिवरचा हा सगळा राडा बघून मात्र आता तुम्हाला खडबडून नीटच जाग येते. दुसरीकडे ’आटप.. आटप लौक्कर.. शाळेची बस यायला फक्त वीस मिनीटंच राहिलीयेत” असा आईचा धोशा सुरूच असतो. हा सगळा पसारा बघून आईचा ओरडा बसू नये, असं तर तुम्हाला मनातून वाटत असतं. आता कशी बुवा भरणार परत ट्यूबच्या आतमधे पेस्ट?

आता तुम्हीच सांगा, लुसिअस आणि त्याच्या बाबांनी ट्यूबच्या आत पेस्ट भरायला काय वापरलं असेल? एखादी कान साफ करायची काडी? किंवा अगदी छोटासा चमचा? की एखादी दात कोरायची काडी?

सुदैवानं डॉ. शेफल्डि यांच्यासाठी मात्र ट्यूबमधे पेस्ट भरणं आपल्याला वाटतं तितिकं काही कटकटीचं नव्हतं. त्यांनी चक्क टूथपेस्टचं झाकण न उघडताच ती आत भरण्याची कमिया करून दाखवली होती. होय. अगदी खरंच! त्यांनी टूथपेस्टचं झाकण घट्ट बंद केलं आणि पेस्ट चक्क तचि्या दुसऱ्या म्हणजे मागच्या बाजूकडून आत भरली होती. ही बाजू झाकणाच्या मानानं अधकि रुंद असल्यानं तथिून पेस्ट आत भरणं अधकि सोपं असतं. शविाय जरा जोर लावून पेस्ट आत भरायला तुमच्याकडे जर एखादी छोट्या पचिकारीसारखी गोष्ट असेल, तर मग हे काम अगदी चुटकीसरशीच फत्ते होणार यात शंकाच नको. नंतर दुसऱ्या बाजूनं ट्यूब घट्ट बंद केली की पेस्टची सांडलवंड व्हायचीही चिंता नाही.





हल्ली टूथपेस्ट ट्यूबमधे मशीनच्या साहाय्यानं भरली जाते. एका सरकत्या पट्ट्यावर मोकळ्या ट्यूब लावून ठेवलेल्या असतात. त्यांची झाकणाची बाजू खालच्या दिशेने असते आणि दुसरी, अजून सीलबंद न केलेली बाजू मात्र वरच्या दिशेने तोंड करून ठेवलेली असते. सरकत्या पट्ट्याच्या वरच्या भागात बसवलेल्या एका मोठ्या भांड्यात टूथपेस्ट भरून ठेवलेली असते.



त्या पात्राच्या तळात एक छोटाशी तोटी बसवलेली असते. सरकत्या पट्ट्यावरून रिकामी ट्यूब पुढे सरकली, की त्या तोटीमधून रिकाम्या ट्यूबमधे पेस्ट भरली जाते. पण ट्यूब अगदी काठोकाठ भरत नाहीत बरं का. नंतर ती बाजू घट्ट बंद करता यावी म्हणून साधारण अर्धा इंच जागा मोकळी सोडलेली असते.

झालं! आता ट्यूब सीलबंद झाली, की पेस्ट ट्यूबमधून सर्रऽऽरऽऽकन बाहेर यायला तय्यार!

आपले दात निरोगी ठेवण्यासाठीचं प्राचीन भारतातलं पारंपरिक ज्ञान

· भारतात आजही अनेक लोक आपले दात स्वच्छ करायला कारखान्यात बनवलेल्या ब्रशऐवजी दातून चा म्हणजे लिंबाच्या किंवा बाभळीच्या झाडाच्या

काडीचा वापर करतात. दातूनमुळं दात आणि हिरड्या निरोगी राहतात. पण जगातला सर्वोत्तम ब्रश कुठला ते ठाऊक आहे? आपली बोटं! दंतवैद्यांच्या मतानुसार बोटांनी दात आणि हिरड्या स्वच्छ करणं, हे सर्वात चांगलं.

· तुम्ही कधी दंतमंजन वापरून पाहिलं आहे का? ते वापरताना तुम्हाला कशाकशाचे वास ओळखता आले?

· पुदिना, लवंग, दालचिनी, काळी मिरी आणि तुळस यांसारखे मसाल्याचे पदार्थ आणि वनस्पती दातांसाठी चांगल्या असतात.

· सफरचंद, गाजरं यांसारखे तंतुमय पदार्थ खाताना दात आपोआप स्वच्छ होत असल्यानं तेही दातांच्या आरोग्यासाठी चांगले.



टूथपेस्टचं झाकण वापरून करायच्या मजेशीर कृती

PRATHAM BOOKS storyweaver

This book was made possible by Pratham Books' StoryWeaver platform. Content under Creative Commons licenses can be downloaded, translated and can even be used to create new stories - provided you give appropriate credit, and indicate if changes were made. To know more about this, and the full terms of use and attribution, please visit the following link .

Story Attribution:

This story: ट्यूबच्या आत टूथपेस्ट शरिते तरी कशी? is translated by Sushrut Kulkarni . The © for this translation lies with Storyweaver, Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Based on Original story: ' How Does the Toothpaste Get into the Tube? ' , by Veena Prasad . © Storyweaver, Pratham Books , 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

Other Credits:

This book has been published on StoryWeaver by Pratham Books.The development of this version of the book has been supported by Oracle Giving Initiative. www.prathambooks.org

Illustration Attributions:

Cover page: Toothpaste , by Rajiv Eipe © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 2: Children and mother early in the morning , by Rajiv Eipe © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 3: Children brushing their teeth , by Rajiv Eipe © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 4: A girl dipping a stick into a jar , by Rajiv Eipe © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 5: An old woman holding a toothstick , by Rajiv Eipe © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 6: Shocked parents, a boy looking with disgust at a jar , by Rajiv Eipe © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 7: A man watching an artist paint , by Rajiv Eipe © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 9: Man thinking, a tube of paste , by Rajiv Eipe © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 11: A smiling man, tubes of toothpaste , by Rajiv Eipe © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 12: Toothpaste factory , by Rajiv Eipe © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Disclaimer: https://www.storyweaver.org.in/terms_and_conditions

Some rights reserved. This book is CC--BY--4.0 licensed. You can copy, modify, distribute and perform the work, even for commercial purposes, all without asking permission. For full terms of use and attribution, http://creativecommons.org/licenses/by/4.0/
The development of this book has been supported by Oracle Giving Initiative.

PRATHAM BOOKS
storyweaver

This book was made possible by Pratham Books' StoryWeaver platform. Content under Creative Commons licenses can be downloaded, translated and can even be used to create new stories - provided you give appropriate credit, and indicate if changes were made. To know more about this, and the full terms of use and attribution, please visit the following link .

Illustration Attributions:

Page 13: Tubes of toothpaste , by Rajiv Eipe © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 14: Herbs, spices and other stuff that goes into making toothpaste , by Rajiv Eipe © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 15: Toothpaste caps , by Rajiv Eipe © Pratham Books, 2015. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Disclaimer: https://www.storyweaver.org.in/terms_and_conditions

cc BY

[redacted]

Some rights reserved. This book is CC--BY--4.0 licensed. You can copy, modify, distribute and perform the work, even for commercial purposes, all without asking permission. For full terms of use and attribution, http://creativecommons.org/licenses/by/4.0/

The development of this book has been supported by Oracle Giving Initiative.

ट्यूबच्या आत टूथपेस्ट शरिते तरी कशी? (Marathi)

दररोज सकाळी ट्यूब दाबून त्यातून टूथपेस्ट बाहेर काढणं किती सोप्पं आहे नाही? पण पेस्ट ट्यूबच्या आत जाते कशी, हे तुम्हाला ठाऊक आहे का? हे गुपित उलगडलं आहे या पुस्तकात.

या पुस्तकाची वाचन पातळी ३ आहे. आपले आपण वाचू शकणाऱ्या मुलांसाठी.

PRATHAM BOOKS storyweaver

Pratham Books goes digital to weave a whole new chapter in the realm of multilingual children's stories. Knitting together children, authors, illustrators and publishers. Folding in teachers, and translators. To create a rich fabric of openly licensed multilingual stories for the children of India -- and the world. Our unique online platform, StoryWeaver, is a playground where children, parents, teachers and librarians can get creative. Come, start weaving today, and help us get a book in every child's hand!